# ग्रामीण कथांचा जिवंत अनुभव

## वसंत व्याख्यानमालेत शंकर पाटील यांच्या कथांचे वाचन

**सकाळ वृत्तसेवा**

इचलकरंजी, ता. ५ : ज्येष्ठ ग्रामीण कथाकार शंकर पाटील यांच्या जन्मशताब्दीनिमित्त आपटे वाचन मंदिराच्या वसंत व्याख्यानमालेत अभिवाचनाचा रंगतदार कार्यक्रम झाला. दुसरे पुष्प गुंफताना डॉ. वर्षा तोडमल, प्रसाद कुलकर्णी आणि गौरी लागू (पुणे) यांनी कथाकार पाटील यांच्या निवडक कथांचे प्रभावी सादरीकरण करत रसिकांना ग्रामीण जीवनाचा जिवंत अनुभव दिला.

'वळीव', 'टाकीचं घाव' आणि 'धिंड' या कथांच्या अभिवाचनातून शंकर पाटील यांनी साहित्यकृतीत उभ्या केलेल्या ग्रामीण संस्कृतीचे, बोलीभाषेचे, मानवी स्वभावाचे आणि जीवनमूल्यांचे जिवंत दर्शन घडले. आवाजातील चढ-उतार, भावस्पर्शी संवाद आणि नेमक्या शब्दफेकीमुळे कथांतील पात्रे श्रोत्यांसमोर उभी राहिली. सादरीकरण करताना डॉ. तोडमल म्हणाल्या, 'मराठी साहित्यात ग्रामीण कथांना स्वतंत्र ओळख मिळवून देण्यात शंकर पाटील यांचे उल्लेखनीय योगदान आहे. त्यांच्या कथांमध्ये खेड्यापाड्यातील साधी माणसे, त्यांचे भावविश्व, संघर्ष, विनोद आणि सामाजिक वास्तव यांचे सहज, ओघवत्या शैलीत चित्रण दिसते. ग्रामीण बोलीभाषेचा प्रभावी वापर, हलक्याफुलक्या विनोदातून गंभीर आशय मांडण्याची हातोटी आणि जीवनमूल्यांची जाण ही त्यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये आहेत.'




इचलकरंजी : वसंत व्याख्यानमालेत मंगळवारी दुसऱ्या दिवशी ग्रामीण कथाकार शंकर पाटील यांच्या कथांच्या अभिवाचनाचा कार्यक्रम झाला.

शंकर पाटील यांचे भाचे कल्गोंड पाटील (चंदूर), तसेच तारदाळ येथील शंकर पाटील ग्रंथालयाचे संचालक गजानन खोत यांचा सत्कार केला. उपाध्यक्ष काशिनाथ जगदाळे, कार्यवाह प्रा. मोहन पुजारी यांनी स्वागत केले. ज्येष्ठ संचालक राजेंद्र घोडके यांनी परिचय करून दिला व आभार मानले.